**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info   Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२०/२०२०-२१/०२/वेतनपथक, पुणे दिनांक - २३ एप्रिल, २०२०

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे एप्रिल - २०२०.**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०२० चे वेतन अनुदानाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन त्याप्रमाणे सदरहू माहिती एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी आणि सदरहू देयक या कार्यालयाकडे फॉरवर्ड करण्यात यावे. माहे एप्रिल, २०२० चे वेतनाचे काम घरातच बसून पूर्ण करावयाचे आहे हे पत्र दाखवून महाविद्यालय अथवा विद्यापीठामध्ये जाण्याचे टाळावे.

शासन पत्र वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-५ दिनांक २२ एप्रिल, २०२० अन्वये वित्त विभागाने माहे एप्रिल, २०२० चे वेतन नियमित पद्धतीने करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार माहे एप्रिल २०२० चे ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने वेतन देयक तयार करुन फॉरवर्ड/सादर करावे

माहे एप्रिल, २०२० चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी.पी.एस.) कर्मचा-यांची मे, २००७ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी **महागाई भत्त्याचे ०६ टक्के दराने परिगणन करावे.**

**जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे जून, २०२० मध्ये सेवानिवृत्त होणार आहे त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

**वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वत: यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन वर आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे एप्रिल, २०२० चे वेतन देयक **दिनांक २५ एप्रिल, २०२०** पर्यंत एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये फॉरवर्ड करण्यात यावे. तसेच अशा ऑनलाईन पद्धतीने तयार केलेल्या वेतन देयकाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती इमेलद्वारे payunit@jdhepune.info या इमेल आयडीवर **दिनांक २४ एप्रिल, २०२०** पर्यंत सादर करण्यात यावी. तसेच जे कर्मचारी ऑफलाईन पद्धतीने वेतन घेतात त्यांचीदेखील विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती इमेलद्वारे payunit@jdhepune.info या इमेल आयडीवर सादर करण्यात यावी.

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे